MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : ११ अंक : ६ पाने : १२ ■ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

***प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,***

पारेषण वीज वाहिन्या व उपकेंद्रातील उपकरणांची योग्यरित्या निगा राखणे आणि पारेषण यंत्रणेची उपलब्धता उच्चतम स्तरावर ठेवणे, हे आपल्यासाठी नेहमीच आव्हान राहिले आहे. त्यात महापारेषण कंपनी नवे तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित मनुष्यबळाच्या आधारे सतत सुधारणा करत राहिला आहे. मात्र, वाहिनीतील वीज प्रवाह थांबवूनच निगा राखणे किंवा दुरुस्ती करणे, या अपरिहार्यतेमुळे त्यासंबंधीची उद्दिष्टे पूर्ण करण्यास मर्यादा होत्या. आता हॉटलाईन मेंटेनन्स या नव्या पद्धतीमुळे एक मोठा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीला आपले काम अधिक कार्यक्षमतेने करता येत आहे.

- *वाहिनी खंडित न करता सुव्यवस्थेची कामे*
- *आर्थिक नुकसान नाही, वीजपुरवठाही सुरळीतपणे*
- *वाहिनीची उपलब्धता व विश्वासार्हता वाढीस*
- *संभाव्य बिघाडांची दुरुस्तीही शक्य*
- *हॉटलाईन मेंटेनन्सची उपकरणे, अवजारे आधुनिक*

आपणा सर्वांनाच माहित आहे की, राज्य वीज नियामक आयोगाने महापारेषण कंपनीसाठी ठरवून दिलेल्या कामगिरी अनुश्रवणात (Performance Monitoring) प्रणालीची उपलब्धता एच.व्ही.ए.सी. साठी ९८ टक्केच्या वर व एच.व्ही.डी.सी. साठी ९५ टक्क्यांवर राखणे व पारेषण हानी ४.८५ च्या खाली राखणे हे मुख्य मुद्दे आहेत. तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या काळात वाहिनीवर सुव्यवस्थेचे काम करताना वाहिनी खंडित करूनच काम करणे अपरिहार्य होते. सबब वाहिनीची उपलब्धता व पर्यायाने पारेषण हानी मर्यादित राखणे आव्हानात्मक होते. यात बदल करणे, हे महापारेषण कंपनीसाठी एक मोठी कामगिरी होती. आता महापारेषण कंपनीच्या कार्यकाळापासून व्यवहारात नव्यानेच आलेल्या हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानात ऊर्जित वाहिनीवर, वाहिनी खंडित न करता सुव्यवस्थेची कामे करणे शक्य होत आहे. वाहिनी खंडित न करता काम करण्यात येत असल्याने आर्थिक नुकसान होत नाही व वीजपुरवठाही सुरळीतपणे सुरु ठेवणे शक्य होते.

हॉटलाईन मेंटेनन्स या तंत्रज्ञानामुळे वाहिनीची उपलब्धता व विश्वासार्हता वाढीस लागली आहे. या तंत्रज्ञानामुळे प्रतिबंधक उपाययोजना करणे शक्य होत असल्यामुळे संभाव्य बिघाडांची आधीच दुरुस्ती करणे शक्य होत आहे. महापारेषण कंपनीत हॉटलाईन मेंटेनन्स युनिटस कार्यान्वित आहेत. महापारेषण आपल्या हॉटलाईन मेंटेनन्स युनिटमधील कर्मचाऱ्यांसाठी बारा आठवड्यांचे प्रशिक्षण एनपीटीआय, बेंगलुरु येथे आयोजित करते. त्याअंतर्गत Live Line Maintenance Technique (LLMT) चे २२० के.व्ही. पर्यंत Hot Stick Method (HSM) व Bare Hand Method (BHM) प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना दिले आहे.

जनरेटिंग स्टेशन, हाय होल्टेज ट्रान्समिशन लाईन्स आणि रिसिव्हिंग सब स्टेशन या ठिकाणी प्रवाह चालू असताना निगा राखण्याचे काम करावे लागते. पूर्वी प्रवाह बंद करून ही कामे करावी लागत होती. मधल्या काळात नव्या तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला, तरीही त्याला मर्यादा होत्या. लाइव्ह लाईन मेंटेनन्सच्या या नव्या तंत्रज्ञानाने मात्र त्यात आमुलाग्र बदल होत आहे.

हॉट स्टिक पद्धतीच्या (एच.एस.एम.) लाईव्ह लाईन मेंटेनन्समध्ये लाईनमन जमिनीवरूनच काम करू शकतो. तो लाईनपासून सुरक्षित अंतरावर तर असतोच, पण हॉट स्टिकमुळे त्याला चालू प्रवाहांत काम करता येते. बेअर हँड पद्धतीच्या (बी.एच.एम.) लाईव्ह लाईन मेंटेनन्समध्ये लाईनमन जमिनीवर नसतो. तो लाईनच्या अधिक जवळ जातो. त्याने एक विशिष्ट सूट घातलेला असतो, ज्यामुळे त्याला विजेचा प्रवाह चालू असताना दुरुस्ती करता येते. हे सूट अतिशय सुरक्षित आहेत. त्यात २५ टक्के मायक्रोस्कोपिक स्टेनलेस स्टील तर ७५ टक्के नोमक्स असते. या दोन्ही पद्धतींचे लाईनमनला आधीच प्रशिक्षण दिले जाते.



**राजीव कुमार मित्तल** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

११ के. व्ही. ते २२० के.व्ही.चा दबाव असताना हॉट स्टिक पद्धत वापरली जाते, तर ४०० के.व्ही. आणि त्यापुढील दबावासाठी बेअर हँड पद्धती आणि एकत्रित पद्धती वापरली जाते.

हॉटलाईन मेंटेनन्स युनिटव्दारे प्राधान्याने करण्यात येणाऱ्या कामांमध्ये चालू वाहिनीवर पारेषण वाहिनी व उपकेंद्रातील Hot Spot हाताळणे, विद्युतरोधक चकती (Insulator Disc) बदलविणे, Preventive Maintenance अंतर्गत उपकेंद्रातील उपकरणांचे नट-बोल्ट फिट करणे याव्दारे भविष्यात उदभवणारी समस्या कमी करण्यास मदत होईल.

लाईन मेंटेनन्सच्या पारंपारिक पद्धतीमुळे तो दुरुस्त करण्यास खूप वेळ जात होता, श्रम जात होते, अधिक खर्च होत होता. पण, नव्या पद्धतीत वेळ, खर्च तर वाचलाच आहे आणि ग्राहकाला अखंडित वीजपुरवठा मिळण्यात मदत होत आहे.

देशात विजेच्या अखंडित सेवेला महत्त्व आहे. अशावेळी महापारेषणने हॉटलाईनच्या माध्यमातून विजक्षेत्रात एक पाऊल पुढे टाकलेले आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



प्रकाशगंगा, मुंबई : 'महापारेषण'च्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, श्री. विश्वास पाठक, श्री. रवींद्र चव्हाण, श्री. गणपत मुंडे, श्री. विनायक साठे, श्री. सूरज वाघमारे.

## महापारेषणचा पाच वर्षांचा आराखडा, १४ हजार २५३ किलोमीटरच्या वाहिन्यांचे जाळे

# राज्यात ८६ अतिउच्च दाबाची उपकेंद्रे

*टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषण येत्या पाच वर्षांत राज्यात ८६ अतिउच्च दाबाची उपकेंद्रे उभारणार असून, १४ हजार २५३ किलोमीटरच्या वाहिन्यांचे जाळे पसरवून राज्यातील नागरिकांना पूर्ण दाबाने वीज उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती श्री. ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मुंबई येथील महापारेषणच्या मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत श्री. चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव कुमार मित्तल यांनी पुढील २०१८ ते २०२२ या पाच वर्षांचा महापारेषणच्या कामाचा आराखडा ऊर्जामंत्री श्री. बावनकुळे यांना सादर केला. बैठकीला सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. सूरज वाघमारे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

३० मार्च रोजी राज्याची उच्चतम विजेची मागणी २३ हजार मेगावॅट होती, तेव्हा महापारेषणने उत्तम काम केले होते. कोणतीही यंत्रणा निकामी न होता व तांत्रिक बिघाड न येता हे करण्यात आल्याचे श्री. मित्तल यांनी सांगितले. आजही २५ हजार मेगावॅटपर्यंत वीज पारेषित करण्याची क्षमता कंपनीची आहे. महाराष्ट्रात महापारेषणची ४०० के.व्ही. व त्यावरील ३२ उपकेंद्रे आहेत. अन्य राज्यांच्या तुलनेत ही संख्या जवळजवळ दुप्पट आहे. २२० के.व्ही.ची २१९ उपकेंद्रे आहेत. अमरावती विभागात ५, औरंगाबाद ५, नागपूर ६, नाशिक ३, पुणे ४ आणि वाशी येथे १ उपकेंद्राचे काम सुरु झाले आहे. राज्यातील ७ विभागांतील लोकप्रतिनिधींनी एकूण ७२ उपकेंद्राची मागणी केली आहे. त्यानुसार आराखड्याची अंमलबजावणी सुरु केली जाणार आहे. पाच वर्षाच्या आराखड्यात दुसरी वाहिनी ओढणे, वीज तार बदलणे, नवीन व्होल्टेज विद्युत स्तर निर्माण करणे, क्षमता वाढवणे, नवीन पारेषण वाहिनी जोड तयार करणे आदींचा समावेश आहे. आराखड्यामुळे ३० हजार १९६ एमव्हीए क्षमता वाढणार आहे. १४ हजार २५३ किलोमीटर वीज वाहिन्या नवीन टाकल्या जातील. ३० हजार १९६, एमव्हीएची रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) क्षमता राहणार आहे. या कामांसाठी पाच वर्षात १,३६५ कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. अतिउच्चदाब उपकेंद्रात विदर्भातील अमरावती आणि नागपूर विभागात २५ केंद्रे, उत्तर महाराष्ट्रात १९ केंद्रे, मराठवाडा औरंगाबाद विभागात १४ उपकेंद्रे, उर्वरित महाराष्ट्र-वाशी, पुणे, कराड येथे २८ उपकेंद्रे उभारली जाणार असून यापैकी काहींचे काम सुरु झाले आहे.



### 'महापारेषण'ची घोडदौड

आधीच्या पारेषण क्षमतेत वाढ करून
आता पारेषण क्षमता १५,९००.५ एमव्हीएपर्यंत.







**नागपूर :** अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी मुख्य अभियंता सर्वश्री विकास बढे, सतीश अणे, संजय अत्राम, अविनाश निंबाळकर, अव्दैत देव, संदीप हाके.

## ■ नवीन उपकेंद्रे, वाहिन्यांचे काम तातडीने करण्याच्या दिल्या सूचना ■

# ऊर्जामंत्र्यांनी घेतली नागपूरमध्ये आढावा बैठक

■ *टीम महापारेषण, नागपूर*

अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे नागपूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात झाली.

बैठकीस नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री विकास बढे, अधीक्षक अभियंता सतीश अणे, संजय अत्राम, अविनाश निंबाळकर, अव्दैत देव, संदीप हाके उपस्थित होते. बैठकीमध्ये महापारेषण अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकासकामांबाबत आढावा घेऊन सूचना देण्यात आल्या.

नवीन उपकेंद्रे व वाहिन्यांची कामे दिलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. क्षमतावर्धनाचे व इतर कामे दिलेल्या निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील कॅपॅसिटर बँक उभारणीच्या कामासंबंधी निविदा नागपूर परिमंडळ कार्यालयाकडून मंजूरी देऊन कॅपॅसिटर बँकेची कामे त्वरित सुरु करण्यासंबंधी सूचना देण्यात आली. २२० के.व्ही.नागभीड उपकेंद्र, कारंजा उपकेंद्र व संलग्न वाहिनी उभारणीचे काम त्वरित सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले.



नागपूर परिमंडळातील २०१९-२०२१ मध्ये प्रस्तावित असलेली नवीन उपकेंद्रे व संलग्न वाहिनीचे काम राज्यस्तरीय महापारेषणच्या पंचवार्षिक योजनेमध्ये २०१८-२०१९ मध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिले.

- नवीन उपकेंद्रे व वाहिन्यांची कामे गतीने व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश
- सर्व चालू असलेली क्षमतावर्धनाचे व इतर कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश
- भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील कॅपॅसिटर बँकेचे काम त्वरित करण्याचे निर्देश
- नवीन अतिथीगृह व एम.एस.ई.बी.मानकापूर वसाहत उभारणीच्या कामासंबंधी प्रस्ताव
- नागभीड उपकेंद्र व संलग्न वाहिनी उभारणीचे काम सुरु करण्याचे निर्देश
- कारंजा उपकेंद्र व संलग्न वाहिनी उभारणीचे काम सुरु करण्याचे निर्देश
- वनविभागातर्फे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे



## 'महापारेषण'ची घोडदौड

४७८६ सर्किट किलोमीटरच्या

ईएचव्ही लाईनचे काम पूर्ण.



## निवड



## 'महापारेषण'च्या कार्यकारी संचालक (प्रणाली) पदी डॉ.संजय कुलकर्णी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कार्यकारी संचालक (प्रणाली) पदी डॉ. संजय कुलकर्णी यांनी निवड झाली. दि.१६.११.२०१७ पासून ते 'महापारेषण'मध्ये कार्यकारी संचालक (प्रणाली) म्हणून रुजू झाले आहेत.

डॉ. कुलकर्णी यांची तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये १९८२ मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी कळवा येथे उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता म्हणून काम केले. सांघिक कार्यालय, मुंबई येथे अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता म्हणूनही काम केले आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमधून त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे.

पारेषण प्रणाली संचलन व नियंत्रण आणि वीजदर विद्युत नियामक व वाणिज्यविषयक बाबी, पारेषण प्रणाली संचलन व नियंत्रण आणि पारेषण प्रणाली नियोजन, अति उच्चदाब पारेषण प्रकल्प उभारणी व प्रकल्प व्यवस्थापन, मानव संसाधन, दक्षता, सुरक्षा व राज्य पारेषण उपक्रम, विभागांत त्यांनी काम केले आहे.

## कायदेशीर व्यवहार; दूर ठेवी भ्रष्टाचार




प्रकाशगंगा इमारत, मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी शपथ घेताना वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

# 'महापारेषण'मध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालये, उपकेंद्रे व भांडारे यामध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. केंद्रीय दक्षता आयोग आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि.३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत हा सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

यानिमित्ताने सांघिक कार्यालयामध्ये भ्रष्टाचार निर्मुलनाची प्रतिज्ञा घेण्यात आली. सुरवातीला कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे यांनी उपस्थितांना प्रतिज्ञा दिल्यानंतर राज्यपाल यांचा या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश वाचून दाखविण्यात आला. प्रकाशगंगा इमारतीमध्ये विविध ठिकाणी भित्तीपत्रके, बॅनर्स, पोस्टर्स आणि घोषवाक्ये लावण्यात आली होती.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. सूरज वाघमारे, मुख्य तपास अधिकारी श्री. श्रीकांत राजूरकर, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. संजयकुमार, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, श्री. एस.पी. सावळे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सप्ताहाचे नियोजन करण्यासाठी मुख्य तपास अधिकारी श्री. श्रीकांत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य तपास अधिकारी श्री. बी.एम. पाटील यांचा सक्रिय सहभाग होता.




प्रकाशगंगा इमारत, मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती वर्षा शिंदे, श्री. महेंद्र वाकळे, श्री. भगवान पाटील.

## अंकाचा नवा लूक मनापासून आवडला

महापारेषण समाचारचा ऑगस्ट-सप्टेंबर २०१७ चा अंक वाचला आणि खूपच आवडला. त्यामध्ये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा लेख तर सर्वांच्या माहितीमध्ये भर घालणारा होता. तसेच मा. कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचा लेख खूप चांगला वाटला. कारण, तंत्रज्ञानाची जोड घेऊन पेपरलेस काम झाल्यास कामाला गती प्राप्त होईल, असे वाटते. नवा प्रयोग या पानावरील लेख वाचून स्पर्धेच्या युगात आपण कुठेही कमी नाहीत असे वाटते. साद-प्रतिसाद हा स्तंभ चांगला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना संवाद साधण्यासाठी खऱ्या अर्थानं नवं व्यासपीठ आहे. प्रत्येक पानाच्या खालच्या बाजूस महापारेषणची उद्दिष्टे लक्ष वेधून घेतात. एकूणच, संपूर्ण अंकांची रंगसंगती आकर्षक आहे. संपादकांना व त्यांच्या टीमला मनापासून खूप-खूप शुभेच्छा..!

***– श्री. प्रवीण चौधरी***

*वरिष्ठ यंत्रचालक, २२० के.व्ही. उपकेंद्र वाडा.*




## 'महापारेषण समाचार'मधील कलात्मकता मनाला भावली

'महापारेषण समाचार' चा ऑगस्ट-सप्टेंबर २०१७ चा अंक वाचला. नवीन कलात्मक पद्धतीने मांडलेला मजकूर आवडला. विशेषतः कलर कॉम्बिनेशन प्रकर्षाने आवडले. एकूणच अंकाची मांडणी पाहून भारावलो. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संवादासाठी साद-प्रतिसाद हे एक नवं माध्यम म्हणून आपण उपलब्ध करून दिलं आहे, त्याबद्दल धन्यवाद...मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचे संदेश आवडले. GIS System बाबतचा लेख व नस्ती व टिप्पणी कशी असावी, याबाबतचा मार्गदर्शनपर लेख आवडला. खरं म्हणजे 'महापारेषण समाचार'चा नवा लूक खूपच आवडला. भविष्यातही असेच दर्जेदार अंक प्रसिद्ध करावेत, अशी अपेक्षा करतो. पुढील कार्यास खूप शुभेच्छा..!

**– श्री. संदीप धाबर्डे**

वरिष्ठ व्यवस्थापक, मानव संसाधन, सांघिक कार्यालय, मुंबई




## नवा प्रयोग मनापासून आवडला

'महापारेषण समाचार' चा ऑगस्ट-सप्टेंबर २०१७ चा अंक वाचला. पान-१० वरील 'प्रायोगिक तत्त्वावरील AMR प्रकल्पाची अंमलबजावणी' ही बातमी आवडली. 'महापारेषण'मध्ये विविध प्रयोग आणि प्रगती पाहून बरे वाटले. विशेष म्हणजे भारतातील इतर राज्यात AMR प्रकल्प सिंगल सिमवर आधारित असतानाही महाराष्ट्रात 'महापारेषण'ने ड्युअल सिम मॉडेमची यशस्वीरित्या चाचणी केली, ही खूप मोठी बातमी आहे. महापारेषण कंपनीच्या शिरपेचात हा मानाचा तुरा आहे, हे मात्र निश्चित. अशा वेगळ्या आणि प्रयोगशील बातम्यांना आपल्या अंकात ठळक स्थान दिल्याबद्दल आपले आभार. पुढील अंकातही अशा प्रयोगशील बातम्यांना आपण ठळक प्रसिद्धी द्याल, अशी अपेक्षा करतो. मनापासून खूप-खूप शुभेच्छा...

**–श्री. विजय आवारे**

कार्यकारी अभियंता, ऊर्जा लेखांकन, एसएलडीसी, कळवा




## अंकातील फोटोंची निवड आवडली

'महापारेषण समाचार'मधील अंकाची मांडणी खूपच आवडली. विशेषतः फोटोंची, रंगांची निवड, फॉन्ट व बातम्यांविषयीची स्पष्टता आवडली. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा.कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचे संदेश आवडले. शासनाच्या पातळीवर झालेले निर्णय शासन-प्रशासन यामध्ये वाचावयास मिळाले. GIS System ची नागपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमाची बातमी छान होती. यामुळे महापारेषण कंपनीने हे काम करून देशातील अन्य पारेषण कंपन्यांसमोर नवीन आदर्श निर्माण केला आहे,

**–सौ. वर्षा व्ही. असोलकर**

प्रणाली विश्लेषक, माहिती तंत्रज्ञान, वाशी परिमंडळ, नवी मुंबई.



*प्रिय अधिकारी व कर्मचारी, महापारेषणमध्ये होणाऱ्या घटना, घडामोडी, तुम्ही केलेल्या चांगल्या कार्याची माहिती, लेख, कविता 'महापारेषण समाचार'साठी कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत छायाचित्रांसह prohr@mahatransco.in या ई-मेलवर पाठवा, ही विनंती.*

***– संपादक मंडळ***



## 'महापारेषण'ची घोडदौड

महापारेषण कंपनीव्दारे २३,०५५ मेगावॅट वीज पारेषित.






**बोराळे, ता. जव्हार :** येथील नियोजित १३२ के.व्ही.जव्हार उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी आदिवासी विकासमंत्री तथा पालकमंत्री श्री. विष्णू सावरा, खासदार श्री. चिंतामण वनगा, माजी जि.प.अध्यक्षा सौ. सुरेखा थेतले, सर्वश्री गणपत मुंडे, संजय शिंदे व अन्य मान्यंवर.

## ■ दुर्गम व आदिवासी भागातील वीजप्रणाली अधिक सक्षम होणार ■

# १३२ के.व्ही.जव्हार उपकेंद्राचे भूमिपूजन

■ *टीम महापारेषण, वाशी*

बोराळे ता.जव्हार जि.पालघर येथील नियोजित १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्राचे भूमिपूजन आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री श्री. विष्णू सावरा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार श्री. चिंतामण वनगा व पालघरच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. सुरेखा थेतले होत्या. यावेळी `महापारेषण`चे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे उपस्थित होते.

सुरवातीला वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजय शिंदे यांनी नियोजित जव्हार उपकेंद्राच्या तांत्रिक बाबींची माहिती सांगितली. यावेळी बोलताना आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री श्री. विष्णू सावरा म्हणाले, `` या उपकेंद्रामुळे जव्हारमधील दुर्गम व आदिवासी भागातील वीजप्रणाली अधिक सक्षम होईल तसेच औद्योगिक विकासाला चालना मिळून रोजगाराची संधी आदिवासी बांधवांना उपलब्ध होईल.``

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. भूषण बल्लाळ, श्री. सुनील सूर्यवंशी, सौ. जुईली वाघ, श्री. मोरेश्वर जांगडे, श्री. सतीश गहेरवार, श्री. सचिन खडगी, श्री. आप्पासाहेब रुपटक्के , श्री. रवींद्र नगरे, श्री. महेंद्र साळुंके यांनी परिश्रम घेतले.



**बोराळे, ता. जव्हार :** येथील नियोजित १३२ के.व्ही.जव्हार उपकेंद्राचे भूमिपूजन करताना आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री श्री. विष्णू सावरा, शेजारी खासदार श्री. चिंतामण वनगा, माजी जि.प.अध्यक्षा सौ. सुरेखा थेतले, सर्वश्री गणपत मुंडे, संजय शिंदे ,भूषण बल्लाळ, सुनील सूर्यवंशी, मोरेश्वर जांगडे, सतीश गहेरवार, सौ. जुईली वाघ व अन्य मान्यंवर.



## ‘महापारेषण’ची घोडदौड

एचव्हीएसी प्रणालीच्या उपलब्धतेत ९९.६३ टक्क्यांची वाढ.

(एमईआरसीचे प्रमाणीकरण ९८ टक्के)



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सर्वश्री संचालक (वित्त) विनायक साठे, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (प्रकल्प) रवींद्र चव्हाण, कार्यकारी संचालक (मा.सं.) सूरज वाघमारे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) सुगत गमरे, औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, मुख्य अभियंता संवसु श्रीकांत राजूरकर, मुख्य सुरक्षा अधिकारी संजय कुमार, मुख्य विधी सल्लागार शिवाजी पाटील,



महाव्यवस्थापक (मा.सं.,म.नि.) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्था.) राजू गायकवाड उपस्थित होते. सुरवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ``महापुरुषांनी मांडलेले विचार सर्वांनी आचरणात आणले तर खऱ्या



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई** : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त `महापारेषण'मध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सर्वश्री विनायक साठे, गणपत मुंडे, रवींद्र चव्हाण, सूरज वाघमारे, सुगत गमरे, संजय कुमार.

अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.``, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. याप्रसंगी सर्वश्री रवींद्र चव्हाण, सूरज वाघमारे, सुगत गमरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाकळे यांनी मानले.

# नागपूरमध्ये सात दिवसात ICT बदलण्याचे काम पूर्ण



■ *टीम महापारेषण, नागपूर*

*अंबाझरी, नागपूर येथील २२० के.व्ही. उपकेंद्र २२०/१३२ के.व्ही. १५० MVA ICT काढून त्या ठिकाणी नवीन २२०/१३२ के.व्ही. २०० एम.व्ही.ए.क्षमतेची आय.सी.टी. अवघ्या सात दिवसात उभारण्यात आली.*

*यावेळी ICT LV Side १३२ के.व्ही.च्या High Tan-delta Result असलेल्या ३ CT बदलण्यात आल्या. नवीन CTR Fire Protection System लावण्यात आली. यासाठी नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री विकास बढे, नागपूर प्रविभागाचे अधीक्षक अभियंता एस.डी.अणे, चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता कोकाटे, अ.उ.दा.संवसु विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश तड्डे, २२० के.व्ही.उपकेंद्र अंबाझरीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजू भोजने यांनी परिश्रम घेतले. भविष्यात उपलब्ध होणाऱ्या विजेच्या वहनासाठी व नियोजित दुरुस्ती, देखभालीसाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे हे काम कौतुकास्पद असल्याचे नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. विकास बढे यांनी सांगितले. तसेच काम जलद गतीने केल्याबद्दल कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.*



## ‘महापारेषण’ची घोडदौड

एचव्हीडीसी प्रणालीच्या उपलब्धेत ९७ टक्क्यांची वाढ

(एमईआरसीचे प्रमाणीकरण ९५ टक्के)





**सिल्व्हासा :** येथील अपार इंडस्ट्रिज येथे 'महापारेषण'च्या अभियंत्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी 'महापारेषण'चे वरिष्ठ अधिकारी व प्रशिक्षणार्थी.

# सिल्व्हासा येथे अभियंत्यांसाठी दोन दिवसांची कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

सिल्व्हासा येथील अपार इंडस्ट्रिजमध्ये 'महापारेषण'च्या अभियंत्यांसाठी दोन दिवसांची कार्यशाळा घेण्यात आली. 'HTLS Conductor Applications and Installation Techniques' या विषयावर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत कंडक्टर व ओपीजीडब्ल्यू (OPGW) केबल यांची रचना, उत्पादन, चाचणी व इंस्टॉलेशन या विषयांवरही चर्चा झाली. कार्यशाळेमध्ये मुख्य अभियंता सर्वश्री श्रीकांत राजूरकर, श्रीराम भोपळे, अविनाश कोंडावार यांची उपस्थिती होती. अपार कंपनीतर्फे सर्वश्री पा.जी.व्होरा, हरिश सिंग, सुमित लिंगरचानी, दाच.के.जाना, प्रदीप अग्नीहोत्री यांनी परिश्रम घेतले. यामध्ये 'महापारेषण'च्या सांघिक व क्षेत्रीय कार्यालयातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते अशा पंधरा अभियंत्यांनी सहभाग घेतला.

# तंत्रज्ञ श्रेणी-४ उमेदवारांसाठी पायाभूत प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीच्या सरळसेवा भरती योजनेव्दारे निवड झालेल्या तंत्रज्ञ श्रेणी-४ उमेदवारांचे पायाभूत प्रशिक्षण प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये झाले. त्यामध्ये क्लासरुम प्रशिक्षण व ऑन जॉब प्रशिक्षण यांचा समावेश होता. महापारेषण कंपनीच्या चंद्रपूर (नागपूर परिमंडळ), वाळुंज (औरंगाबाद परिमंडळ), पडघे (वाशी परिमंडळ), जेजुरी (पुणे परिमंडळ) व तळंदगे (कराड परिमंडळ) येथील केंद्रामध्ये हे प्रशिक्षण झाले.



**चंद्रपूर :** महापारेषण कंपनीच्या सरळसेवा भरती योजनेव्दारे निवड झालेल्या तंत्रज्ञ श्रेणी-४ उमेदवारांच्या पायाभूत प्रशिक्षणाप्रसंगी 'महापारेषण'चे वरिष्ठ अधिकारी व प्रशिक्षणार्थी.



## 'महापारेषण'ची घोडदौड

पारेषणातील गळती कमी केल्यामुळे आता ती ३.६३ टक्क्यांवर.
(सन २०१३-१४ मध्ये ही गळती ४.०९ टक्के होती.)








**कोराडी, जि.नागपूर :** महापारेषण कंपनीच्या सांघिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) प्रकल्पांतर्गत केलेल्या कामांची अधिकाऱ्यांनी पाहणी केली. याप्रसंगी सर्वश्री सूरज वाघमारे, अनंत पाटील, महेश सावंत, अशोक शिवदे, आर.डी.पांढरे, विवेक ए.गोराडे.

## 'महापारेषण'च्या सी.एस.आर. प्रकल्पांची पाहणी

# कोराडी परिसरातील प्रकल्पांना अधिकाऱ्यांनी दिली भेट

*टीम महापारेषण, नागपूर*

महापारेषण कंपनीच्या सांघिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) प्रकल्पांतर्गत केलेल्या कामांची पाहणी करण्यात आली.

यामध्ये कोराडी परिसरातील ४६ गावांमध्ये हायमास्ट दिव्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोनखेरी, सुरादेवी, वारेगाव, खैरी, कवठा, मसाळा या सहा गावांमध्ये वॉटर ए.टी.एम. सुरु करण्यात आले आहे. सुरादेवी ते कोराडीदेवी रस्त्यावर एल.ई.डी.लाईट ८० पोल उभे करण्यात आले आहेत.

बाबुलखेडा ग्रामपंचायत भवन येथील हायमास्ट, लोनखेरी बुद्धनगरजवळ नांदा येथील हायमास्ट, चिंचोली येथील हायमास्टची पाहणी करण्यात आली. लोनखेरी व सुरादेवी येथील वॉटर ए.टी.एम.ची पाहणी करण्यात आली. पाच रुपयांचे कार्ड सेन्सर केल्यानंतर २० लीटर पाणी मिळते. तसेच कार्ड रिचार्ज करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना काम देण्यात आले आहे. सुरादेवी ते कोराडीदेवी ८० पोलचे काम झालेले आहे.

यावेळी 'महापारेषण'चे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सर्वश्री सूरज वाघमारे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, नागपूर परिमंडळाचे सहाय्यक महाव्यवस्थापक महेश सावंत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) अशोक एन.शिवदे, उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) आर.डी.पांढरे, सहाय्यक अभियंता विवेक ए.गोराडे उपस्थित होते.



## 'महापारेषण'ची घोडदौड

मेळघाटमधील आदिवासीबहुल भागात १५२ गावांसाठी १३२ किलोवॅटच्या वीजग्रहण उपकेंद्राची स्थापना आणि त्याव्दारे या गावांचे विद्युतीकरण.






# महापारेषण कंपनीमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महापारेषण कंपनीमध्ये २०१७-२०१८ या वार्षिक क्रीडास्पर्धेमध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा डिसेंबर-जानेवारी महिन्यात होतील, अशी माहिती मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांनी दिली.

यामध्ये अमरावती, औरंगाबाद, कराड, पुणे, नागपूर, नाशिक, वाशी आणि मुंबईतील परिमंडळाचा समावेश आहे. प्रविभागीय स्तर (आंतर-विभागीय), परिमंडळ स्तर (आंतर प्रविभागीय), राज्यस्तर (आंतर-परिमंडळीय) स्पर्धा होणार आहे. यामध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे, १५०० मीटर धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक या मैदानी खेळांचा समावेश आहे. तर आंतरग्रह क्रीडा स्पर्धेत बॅडमिंटन (सिंगल, डबल), टेबल टेनिस (सिंगल, डबल), कुस्ती, ब्रीज, कॅरम, बुद्धिबळ या खेळांचा समावेश आहे.

## शार्दुल रणदिवेला ब्राँझ पदक

■ *टीम महापारेषण,*

**सातारा :** भारतीय तिरंदाजी संघाने वाशिममध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेमध्ये नऊ वर्षाखालील गटामध्ये शार्दुल रणदिवे याने ब्राँझ पदक मिळविले. विजयवाडा येथे झालेल्या राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेमध्येही त्याने सांघिक सुवर्ण पदक मिळविले आहे. चि. शार्दुल हा २२० के.व्ही. सातारा एम.आय.डी.सी. उपकेंद्रातील यंत्रचालक श्री. संदीप विजय रणदिवे यांचा सुपुत्र आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


THE CONSTITUTION OF INDIA

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity; and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

## 'महापारेषण'मध्ये संविधान दिवस साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. सुरवातीला कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाकळे यांनी संविधानाचे वाचन केले. त्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले. 'महापारेषण'चे संचालक (वित्त) श्री. विनायक साठे यांनी मार्गदर्शन करून सर्वांचे आभार मानले.



## 'महापारेषण'ची घोडदौड

४४ नवी उपकेंद्रे स्थापन

पाच वर्षात होणार मोठा संरचनात्मक विकास






डॉ.अनबालगन (आयएएस), सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि डॉ.राकेश कुमार, संचालक, नॅशनल एनव्हार्यमेंटल इंजिनिअरिंग एँड रिसर्च इन्स्टिट्यूट, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. दत्तात्रय खोत आणि `महापारेषण`च्या कार्यकारी अभियंता सौ. बीना खोत यांच्यासह शिवानी आणि ईशा.

# पर्यावरण, इंधनबचतीचा 'निळा' सिग्नल!

## मुंबई `आयआयटी` `टेकफेस्ट`मध्ये निवड, महापारेषण अधिकाऱ्याच्या पाल्यांचा गौरव

■ *टीम महापारेषण, मुंबई*

शहरात कुठल्याही मार्गावरील प्रदूषणाचा विचार केला तर वाहतूक सिग्नलवर तेवीस पट प्रदूषण अधिक असते, हे जागतिक पातळीवरच मान्य झाले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊन शेकडो लीटर इंधनही वाया जाते. मात्र सिग्नलवर सर्वांनीच वाहन बंद केले तर पर्यावरण आणि इंधन बचत मोठ्या प्रमाणात होऊ शकते, ही साधी संकल्पना नजरेपुढे ठेवून लाल, पिवळा आणि हिरव्या रंगाबरोबरच 'निळ्या' रंगाच्या चौथ्या सिग्नलची संकल्पना नववीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने मांडली आहे.

मुंबईत चौथ्या सिग्नलची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली तर भायखळा येथील जिजामाता जंक्शनवरील एका सिग्नलवर सकाळी व सायंकाळी प्रत्येकी तीन तासांच्या कालावधीत एकूण पावणेदोन तास वाहन बंद राहील आणि त्यामुळे १५६ लीटर इंधन वाचू शकते आणि ३७१ किलोग्रॅम घातक कार्बनडायऑक्साइड वायूचे विसर्जन रोखले जाऊ शकते, असा या विद्यार्थिनीचा दावा आहे. तिने सर्वेक्षणही केले आहे. नॅशनल एनव्हार्यमेंटल इंजिनिअरिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट म्हणजेच 'निरी'चे संचालक डॉ. राकेश कुमार यांनीही या विद्यार्थिनीचे खास कौतुक केले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'महाराष्ट्र क्लीन एअर मिशन २०२२' या ताज हॉटेलमध्ये झालेल्या राष्ट्रीय परिषदेत हा प्रकल्प घाटकोपरच्या पुणे विद्यार्थिगृहच्या विद्याभवन शाळेत शिकणाऱ्या ईशा खोत हिने मांडला. दिल्ली येथील विज्ञान स्पर्धेसाठी ईशाची निवड झाली होती. डॉ. भाभा केंद्राची शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या ईशाने यासाठी काही वेगळा प्रकल्प हवा, या दिशेने विचार सुरू केला. रस्त्यावर विशेषत: वाहतूक सिग्नलजवळ होणाऱ्या प्रदूषणाबाबत ती नेहमी चर्चा करायची. सिग्नलजवळ नक्कीच अधिक प्रदूषण होते, असे तिला वाटत होते. त्यासाठी मानसशास्त्र विषयात पदवीचे शिक्षण



घेणाऱ्या शिवानी या बहिणीची तिने मदत घेतली. भायखळा येथे जाऊन त्यांनी प्रदूषणाची मोजणी केली. अन्य ठिकाणच्या प्रदूषणाची मोजणी केली तेव्हा त्यात फरक आढळला. हे प्रदूषण रोखण्यासाठी सिग्नलवर वाहन बंद ठेवले तरी हे प्रदूषण कमी होऊ शकते, असे त्यांना वाटले. त्यातूनच चौथ्या रंगाच्या सिग्नलची निर्मिती झाली. संकेतस्थळावरील घोळामुळे हा प्रकल्प पंतप्रधान प्रेरणा पुरस्कारासाठी पाठविता आला नाही. परंतु, मुंबई पोलीस दलात सहायक आयुक्त असलेल्या दत्तात्रय खोत आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये कार्यकारी अभियंता असलेल्या बिना खोत यांनी आपल्या मुलीची मेहनत वाया जाऊ दिली नाही. त्यांनी प्रदूषण मंडळाशी संपर्क साधून ही संकल्पना समजावून सांगितली. अखेर त्यांना राष्ट्रीय परिषदेत हा प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली. त्याचे कौतुकही झाले. आता पेटंट मंजूर व्हावे याची ते वाट पाहत आहेत. प्रदूषण मंडळाचे हवेतील प्रदूषण विभागाचे सहसंचालक विद्यानंद मोटघरे यांनीही या प्रकल्पाचे कौतुक केले. या प्रकल्पाचे मूल्यांकन करून प्रायोगिक अंमलबजावणी करण्याबाबत पर्यावरण विभागाचे प्रदूषण मंडळाच्या सदस्य सचिवांना लेखी पत्र दिले आहे.



सूरज वाघमारे
कार्यकारी संचालक (मासं)

# शिस्त आणि प्रोत्साहनाचे महत्त्व




भारतीय समाज हा वर्षानुवर्षे अनौपचारिक आयुष्य जगणारा समाज राहिला आहे. याचा अर्थ आपण सर्व जण एकेकाळी कृषी संस्कृतीतून आलेलो आहोत. शेतीमध्ये एका दाण्याचे शंभर दाणे करण्याची ताकद आहे आणि अशी ताकद कोणातच नाही. पण, गेल्या शतकात आपल्या देशातही झालेले औद्योगिकीकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे आपल्याला काही समाज नियम निश्चित करावे लागले आहेत. जागतिकीकरण, खासगीकरणामुळे त्याला प्रचंड वेग आला आहे. उद्योगांतील स्पर्धा, भांडवल निर्मिती, निव्वळ नफा, दरमाणशी उत्पादन, गुणवत्ता व्यवस्थापन, ग्राहक सेवा अशा अनेक गोष्टींना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. हे सर्व आता अपरिहार्य झाले असून या निकषांवर पुढे जाण्यासाठी कंपनी किंवा उद्योगांत शिस्त असणे, अतिशय महत्त्वाचे आहे.

भारतीय समाज आणि शिस्त याविषयी नेहमीच बोलले जाते. पण, त्याचा आता सकारात्मक विचार करणे क्रमप्राप्त आहे. कारण, आपण सर्वजण आता संघटित क्षेत्रात काम करणारे नागरिक असून आपल्यावर समाजाने आणि देशाने विशेष जबाबदारी टाकली आहे. ती अशी की, आपण संघटित नागरिक या नात्याने या देशाचे इंजिन आहोत. इंजिन जिकडे जाते, त्याच्यामागे डबे जातात. या न्यायाने आपण जो मार्ग निवडू, तोच समाज निवडतो. शिस्तीचे असेच आहे. आपण जर शिस्तीचे पालन केले तर त्याचा ठसा आधी आपल्या स्वत:वर, मग व्यवस्थापनावर म्हणजे त्या कंपनीवर आणि समाजावर दिसून येतो. त्यामुळे आपली जबाबदारी अधिक आहे, हे आधी समजून घेतले पाहिजे.

आपल्या देशाची लोकसंख्या जेव्हा कमी होती, तेव्हा शिस्तीचे महत्त्व आपल्याला तेवढे जाणवत नव्हते. कारण नैसर्गिक साधने मुबलक होती. त्याचा उपभोग घेणारे कमी होते. तसेच सेवा क्षेत्राचा विकास झाला नव्हता आणि तेवढेच महत्त्वाचे म्हणजे आपल्याला आपले गाव सोडून कुठे जावे लागत नव्हते. पण, जेव्हा आपल्यासारख्या सेवेचे महत्व वाढत गेले आणि आपल्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांची संख्या वाढत गेली, तस-तसे उत्पादन, नफा, भांडवल, मनुष्यबळाचा बारकाईने विचार होऊ लागला. तो विचार करायचा म्हणजे आपल्याला एका विशिष्ट पद्धतीने काम करावे लागणार आहे. तसे काम म्हणजे आज आपण जे काम करत आहोत, त्यापेक्षा आपण उद्या किती चांगले काम करू शकतो? त्याचे मोजमाप करण्याचे आधुनिक मार्ग आणि निकष जगाने शोधून काढले असून त्यानुसार काम झाले पाहिजे, यासाठी व्यवस्थापन नेहमीच प्रयत्न करत असते. पण, शिस्तीचे हे महत्त्व आपण त्याच दृष्टिकोनातून समजून घेतो काय? याचा विचार आपल्याला आता करावा लागणार आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिस्त ही बाहेरून लादली जाण्यापेक्षा ती व्यक्तीच्या स्वेच्छेतून व अंतर्मनातून निर्माण होणे हिताचे असते. कारण शिस्त ही जेवढी आपल्या उद्योगाला उपयोगी ठरते, तेवढीच ती आपल्या वैयक्तिक जीवनातही उपयोगी ठरते, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. कार्यालयीन शिस्तीचा बडगा म्हणून त्या शिस्तीकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले जात असले तरी त्याशिवाय कंपनी पुढे जाऊ शकत नाही. एका संघटित कंपनीचे जबाबदार घटक म्हणून आपल्यावर ही मोठी जबाबदारी आहे, याची जाणीव आपण ठेवूयात आणि शिस्तीचे पाईक होऊयात.

शिस्तीच्या जोडीने महत्त्वाचे ठरते ते म्हणजे चांगले काम करणाऱ्याला शाबासकी, प्रोत्साहन देण्याची गरज असते. आपल्याला नेमून दिलेले काम आपण करतच असतो. त्याचा आपल्याला मोबदला मिळतो, म्हणून आपण काम करतो, हे काही खरे नाही. ते काम ही आपली ओळख असते. त्या कामाला मान्यता म्हणजे त्या व्यक्तीला मान्यता असते. त्यामुळे नेमून दिलेले काम आपण किती चांगल्या पद्धतीने, सातत्याने करतो, याला फार महत्त्व आहे. त्यासाठी अर्थातच प्रोत्साहनाची गरज असते. काम झाले की त्या कर्मचाऱ्याशी वरिष्ठांनी बोलणे, आठवड्याच्या, मासिक, वार्षिक बैठकीत किंवा कार्यक्रमात त्या कर्मचाऱ्याला प्रोत्साहन देणे, चांगले काम करणाऱ्यांचा उल्लेख करणे, त्यांच्या कामाची नोंद घेणे अशा विविध मार्गांनी हे केले गेले पाहिजे. आपण आपल्या कंपनीत हे जाणीवपूर्वक करतो आहोत.

थोडक्यात, शिस्त आणि प्रोत्साहन या दोन्ही गोष्टींची आपल्याला सारखीच गरज आहे. सामुहिक काम सुरळीत चालण्यासाठी अंगी शिस्त बाणणे आवश्यक आहे. तर ही शिस्त मोडली न जाता चांगले काम सातत्याने होण्यासाठी वैयक्तिक प्रोत्साहनाची गरज आहे. आपापल्या स्थानिक ठिकाणी या दोन्ही गोष्टींची जाणीव आपण कशी ठेवतो, यावर आपल्या कंपनीची आणि आपल्या सर्वांची वाटचाल अवलंबून आहे. त्यामुळे या दोन्ही गोष्टींचे महत्त्व आपण काम करताना जपले पाहिजे.

**- सूरज वाघमारे**
**कार्यकारी संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.